॥ न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ॥

## शिक्षण मंडळ, कराड संचालित

## आत्माराम विद्यामंदिर, ओगलेवाडी

# प्रेरणा पुरस्कार २०१९-२०



**मा. डॉ. संतोष शशिकांत सुतार**

सहाय्यक संचालक,

यशवंतराव चव्हाण स्कुल ऑफ रूरल डेव्हलपमेंट, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

सदाशिवगडाच्या पायथ्याशी आत्मारामपंत ओगले यांच्या प्रेरणेने प्रेरित होऊन स्थापन झालेल्या आत्माराम विद्यामंदिर, ओगलेवाडी या शाळेचे आपण नामवंत माजी विद्यार्थी आहात. शैक्षणिक क्षेत्रात प्रथितयश प्राप्त करून आपण आपल्या कर्तबगारीने शाळेची कीर्ती सर्वत्र वृद्धिंगत केलीत. आपल्या कार्यकर्तृत्वाचा आलेख हा सर्वांसाठी आदर्शवत व प्रेरणादायी ठरलेला आहे.

आपण मॉडिलींग अँण्ड अॅनालिसिस ऑफ लोड शेअरींग फिनॉमिनन या विषयामध्ये डॉक्टरेट ही पदवी संपादन केलेली आहे. आपल्या या संशोधन कार्याचा उपयोग औद्योगिक व वैद्यक शास्त्रामध्ये होत आहे. आपण आपल्या कार्यामध्ये केलेल्या प्रगतीमुळे आपणांस विविध पुरस्काराने सन्मानित केले गेले आहे. यु जी सी ने आपणांस फेलोशिप प्रदान केली आहे. आपण लिहिलेल्या संशोधनपर लेखांचे प्रकाशन झाले आहे.

हुशार, मनमिळावू , कार्य करण्याची धडपड, आणि हसतमुख स्वभावाने आपण समाजामध्ये आपले स्थान निर्माण केले आहे. परिश्रम, जिद्द, अभ्यास, कार्यनिष्ठा या बळावर आपण शिक्षण क्षेत्रात योगदान देत आहात. आपल्या कर्तृत्वाचा आम्हास सार्थ अभिमान आहे. आपला उत्साह हा आजी - माजी विद्यार्थ्यांना निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे. या सुयशामध्ये आपल्या कुटुंबियांची साथ ही तितकीच अनमोल आहे. त्यांचेबद्दल आम्ही कृतज्ञता व्यक्त करतो .

आपल्या कार्यकर्तृत्वाच्या गौरवार्थ आज शुक्रवार दि. १० जानेवारी २०२० रोजी शिक्षण मंडळ, कराडचे चेअरमन मा. श्री. बाळासाहेब कुलकर्णी यांच्या शुभहस्ते आणि मान्यवरांच्या उपस्थितीत आपणांस प्रेरणा पुरस्काराप्रीत्यर्थ हे सन्मानपत्र प्रदान करताना आम्हांस मनस्वी आनंद होत आहे. आपले मन:पूर्वक अभिनंदन.

स्थळ : ओगलेवाडी

दि. १० जानेवारी २०२०

**आपले स्नेहांकित**

भा. म. तथा बाळासाहेब कुलकर्णी
**चेअरमन**
**शिक्षण मंडळ, कराड**

चंद्रशेखर देशपांडे
**सेक्रेटरी**
**शिक्षण मंडळ, कराड**

सौ. प्रतिभा तारू
**मुख्याध्यापिका**
**आत्माराम विद्यामंदिर, ओगलेवाडी**